# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी,
पनवेल -४१०२०६.

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२ – २७४५५७५१
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : mohpmc05@gmail.com
वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ 1269 /सन २०२३-२४

दिनांक:०७/०६/२०२३

# पदभरती जाहिरात

**वाचा** :- १. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२-२३ नुसार मंजुर पदे

२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती /१०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र

३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.

४. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ/शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दिं २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत, पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रियेसाठी खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांच्या नेमणुका मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावरून थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहेत. थेट मुलाखती आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल ता. पनवेल जि. रायगड येथे खाली नमूद केलेल्या दिनांकास व वेळेत घेण्यात येतील.अर्जाचा विहित नमुना पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.panvelcorporation.com वर उपलब्ध आहे.

| पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अ. जा | अ. ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | वि.मा .प्र | इ.मा. व | ई डब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | १५ | १ | १४ | बिंदु नामावली लागू नाही | | | | | | | | | |
| Microbiologist | १ | ० | १ | • बिंदु नामावली लागू नाही | | | | | | | | | |
| Epidemiologist | १ | ० | १ | • बिंदु नामावली लागू नाही | | | | | | | | | |
| एकूण | १७ | १ | १६ | | | | | | | | | | |

- Microbiologist व Epidemiologist या संवर्गासाठी फक्त ०१ (एकच) पद मंजुर असल्याने शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२१/प्र. क्र.८३५/१६-ब दि. २५/०२/२०२२, नुसार बिंदुनामावली लागु होत नाही.


Scanned with OKEN Scanner

Scanned by CamScanner

**वयोमर्यादा-**

१. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि. **१८.०६.२०२३** रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधन कारक राहील.

**अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-**

१. उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.
२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.
३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष )अचूक नमुद करावे.
४. अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.
५. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे..
६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:च्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. पात्र उमेदवारांची यादी थेट मुलाखतीच्या वेळी सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.
९. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
१०. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.
११. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**

| अ क्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | १४ | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ३०,०००/- |
| २ | मायक्रोबायोलॉजिस्ट Microbiologist | ०१ | MD Microbiology Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ७५,०००/- |
| ३ | इपिडिमिओलॉजिस्ट Epidemiologist | ०१ | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health Preference will be given to experienced person | खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष व मागास वर्गीयांसाठी ४३ वर्ष | ३५,०००/- |

Scanned with OKEN Scanner

Scanned by CamScanner

१. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.

२. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.

३. अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

४. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबंधित संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावे .

५. उमेदवारांनी फॉर्ममध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.

६. उमेदवारांनी मुलाखतीवेळी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.

७. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे..

**अनुभव -**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे.अशाच शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचा तपशील फॉर्ममध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा...

३. अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

४. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**संगणक अर्हता-**

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा..

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-**

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रूजु होण्या अगोदर सादर करणे अनिवार्य आहे..

**अर्ज शुल्क -**

१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. Any बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. " INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL"

२. राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्ष (Demand Draft) शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ते अर्जअपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

Scanned by CamScanner

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१. उमेदवाराने फॉर्म वर फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.

२. राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**

मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-

१. सदर पदभरती करिता पात्र होणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत पनवेल महानगरपालिका स्तरावरील निवड समितीमार्फत घेण्यात येईल.

२. मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती –**

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knowledge | १० |
| २ | "Research & Academic Knowledge " | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Abilities | १० |
| ५ | **Experience** | १० |
| | a) For Govt. Experience | २ Marks for one year |
| | b) For Private Experience | १ Marks for one year |
| | **एकुण गुण** | **५०** |

३. सदरील थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) करून त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

४. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असले अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**सर्वसाधारण सुचना-**

१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी https://www.panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या *पदाचा राज्यशासनाच्या पदाशी* काहीही संबंध नसून उमेदवार *राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची* मागणी करु शकणार नाही.

३. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित ठोक मानधन आहे.

४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. (उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरेल)

५. थेट मुलाखतीकरिता इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील कागदपत्रे १ ते १३ जोडण्यात यावीत.

Scanned with OKEN Scanner

Scanned by CamScanner

उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे. संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे वरील अटी व शर्तीनुसार आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल ता. पनवेल जि. रायगड या पत्त्यावर पुढील वेळापत्रकानुसार थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहावयाचे आहे.

**थेट मुलाखतीचे वेळापत्रक :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | मुलाखती दिनांक | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | दि. १९.०६.२३ | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी ९ ते ११ | वासुदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल ता. पनवेल जि. रायगड |
| २ | मायक्रोबायोलॉजिस्ट Microbiologist | दि. २०.०६.२३ | | |
| ३ | इपिडिमिओलॉजिस्ट Epidemiologist | दि. २०.०६.२३ | | |

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्म
२) वयाचा पुरावा
३) पदवी/पदविका प्रमाणपत्र
४) गुणपत्रिका (सर्व वर्षाची गुणपत्रिका)
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/ Any other Medical Graduate with respective council registration(As Applicable).
६) शासकीय/निमशासकीय / खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
७) आधारकार्ड
८) सध्याचा फोटो
९) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
११) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
१२) Domicile Certificate
१३) राष्ट्रीयकृत बँकेचा Demand Draft

**सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत.**

(डॉ.आनंद गोसावी)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

Scanned by CamScanner

# अर्जाचा नमुना

( ________________________________ या पदासाठी अर्ज )

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

१. संपूर्ण नाव :-----------------------------------------------------

(प्रथम आडनाव )

२. वडिलाचे / पतीचे नाव :-----------------------------------------------------

३. सद्या राहण्याचा पत्ता :-----------------------------------------------------

-----------------------------------------------------

४. भ्रमणध्वनी क्रमांक :(१)------------------------------(२)-----------------------

५. जन्मतारीख :----------------------- दिनांक : / /२०२३ रोजीचे वय ----------

राष्ट्रीयत्व --------------------

६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :--------------------------------------------

७. (अ) जात :---------------------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही.

८. धर्म :----------------------------------------------------------------------

९. ई- मेल आयडी :--------------------------------------------------------------------

१०. शैक्षणिक अर्हता :-

जसे MBBS/ MD Microbiology / Epidemiologist - Any Medical Graduate with MPH /MHA /MBA

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

११. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(स्वप्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती)

१२. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(प्रमाणपत्राच्या प्रती)

१३. *अवगत असणाऱ्या भाषा :*

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१४. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१५. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| १. | २ |
| ३. | ४. |

१६. वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

# प्रतिज्ञापत्र

## नमुना अ

मी. श्री. /श्रीमती / कुमारी,....................................................................................................

.....................श्री. ..........................................................................................................

यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय.............................वर्ष,

राहणार.............................................................................

या द्वारे असे जाहिर करतो / करते की,

(१)मी.......................................................................................................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ............................ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.०१ऑक्टोबर २०२२ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

(३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० व तद नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

सही/-

दिनांक :-

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

# फ़ौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे

# हमीपत्र

मी.श्री./श्रीमती/कुमारी.............................................................................................................

वय................ वर्ष................................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर ................वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner